आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१५ जून २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जी सेवन परिषदेत भावी पिढीसाठी उत्तम जगाची निर्मिती करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- चीनच्या कथित अनुचित व्यापारप्रथांवर तोडगा काढण्याचा जी सेव्हन देशांचा निश्चय
- उत्तराखंडमध्ये रस्ते अपघातात १३ जणांचा मृत्यू, सात जण जखमी
- छत्तीसगडच्या बस्तर परिसरात झालेल्या चकमकीत ८ माओवादी ठार, विशेष कृती दलाचा एक जवान शहीद

  **आणि**

- १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं शानदार उद्घाटन, सुब्बय्या नल्लमुत्थू यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**<><><><><>**

जी-सेवन परिषदेत जागतिक समुदायाला लाभदायक ठरतील अशा प्रभावी उपाययोजना आखण्यासह भावी पिढीसाठी एका उत्तम जगाची निर्मिती करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवली, असं प्रतिपादन  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. इटलीचा दौरा आटोपून नवी दिल्लीला परतल्यानंतर हा दौरा अतिशय फलदायी झाल्याचं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या दौऱ्यात जागतिक नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा झाली, असं त्यांनी सांगितलं.

या परिषदेनिमित्त जमलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांशी प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्यात चर्चा केली. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा

यांच्याबरोबरच संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँतोनिओ गुटेरस यांचीही मोदी यांनी भेट घेतली.

**<><><><><>**

चीनच्या कथित अनुचित व्यापारप्रथांवर तोडगा काढण्याचा निश्चय जी सेव्हन देशांनी केला आहे. जी सेव्हन देशांच्या शिखरपरिषदेच्या आजच्या शेवटच्या दिवशी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात हा मुद्दा प्राधान्याने मांडण्यात आला आहे. युक्रेनविरुद्धच्या लष्करी कारवायांसाठी रशियाला शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत पुरवणाऱ्या चिनी वित्तीय संस्थांविरुद्ध पावलं उचलण्याचा इशाराही या देशांनी दिला आहे. याचा हेतू चीनच्या आर्थिक प्रगतीला खीळ घालण्याचा नसून व्यापार उदिमातल्या उचित प्रथांचं संरक्षण करण्याचा आहे, असं या निवेदनात म्हटलं आहे. भारतापासून मध्य युरोपापर्यंत रस्तेबांधणीसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाला या निवेदनात समर्थन दिलं आहे. तसंच हिंद- प्रशांत महासागर क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेत भयमुक्त वावरालाही पाठिंबा दिला आहे. गाझामधे युद्धग्रस्तांना मदत करण्यासाठी विशेषतः महिला आणि लहान मुलांच्या मदतीसाठी संयुक्त राष्ट्र आणि इतर मानवतावादी संस्था संघटनांना ये-जा करता आली पाहिजे असंही निवेदनात ठासून सांगण्यात आलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड मध्ये रुद्रप्रयाग जिल्ह्यात बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्गाजवळ आज एक प्रवासी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले. जखमींना ऋषीकेश इथल्या एम्स रुग्णालयात दाखल

करण्यात आलं आहे. या बसमध्ये २६ प्रवासी होते. सर्व मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकरात लवकर बरं वाटावं अशी प्रार्थना केली आहे. या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचं अर्थसहाय्य दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बस्तर परिसरात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत आज ८ माओवादी मारले गेले, तरविशेष कृती दलाचा एक जवान शहीद झाला. अबुझमाडच्या जंगलात माओवादी सक्रीय असल्याची खबर मिळाल्यावरुन ITBP, जिल्हा राखीव पोलीस आणि विशेष कृती दलाच्या संयुक्त पथकानं शोधमोहिम सुरु केली होती. त्यादरम्यान ही चकमक झाली. माओवाद्यांनी केलेल्या गोळीबारात सुरक्षा दलाचा एक जवान शहीद झाला तर एक जवान जखमी झाला असून त्याच्या जिवाचा धोका आता टळला असल्याचं वृत्त आहे. ठार झालेल्या माओवाद्यांचे मृतदेह, दोन रायफली, BGL लाँचर, आणि इतर शस्त्र आणि दारुगोळा सुरक्षा दलांनी ताब्यात घेतला आहे.

**<><><><><>**

मणिपूरमधील जिरीबाम जिल्ह्यातल्या बोरोबेकरा उपविभागाअंतर्गतच्या भागात शांतता राखण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अतिरिक्त जवान तैनात

केले गेले आहेत. ६ मे पासून इथे पुन्हा सुरू झालेल्या हिंसाचाराचा या क्षेत्रात मोठा प्रभाव दिसून आल्यानं अतिरिक्त जवान तैनात केल्याचं प्रशासनानं कळवलं आहे.

जिल्हा प्रशासनानं आज मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतलेल्या कुटुंबांना स्वयंपाकाचा गॅस सिलिंडरसह इतर आवश्यक वस्तूंचं वाटप केलं. यासोबतच आरोग्य कर्मचाऱ्यांद्वारेही अविरत सेवा पुरवली जात आहे. जिल्हा मुख्यालयात आश्रय घेतलेल्या मुलांसाठी पहिली ते आठवीपर्यंतचे वर्गही सुरू केले आहेत.

**<><><><><>**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाशी संबंधित एका बनावट संकेतस्थळावरून नोकरी देण्याचं आश्वासन दिलं जात असल्याचं उघडकीस आलं आहे. यासाठी या बनावट संकेतस्थळावर नाव नोंदणीसाठी ४३५ रुपये आकारण्यात येत होते. ही गोष्ट उघडकीस आल्यानंतर पीआयबीच्या फॅक्ट चेक विभागानं याची शहानिशा करत हे संकेतस्थळ बनावट असल्याचं सांगितलं. socialjustice.gov.in हे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचं अधिकृत संकेतस्थळ आहे.

**<><><><><>**

१८व्या 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिला जाणारा व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विख्यात वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना देण्यात आला. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, ज्येष्ठ निर्माते किरण शांताराम, अभिनेता रणदीप हुडा यांनी आज हा पुरस्कार प्रदान केला. 'मिफ'चं औपचारिक

उद्घाटन आज संध्याकाळी मुंबईत झालं. भारतीय चित्रपटक्षेत्राच्या वाढीसाठी सरकार वचनबद्ध आहे. माहितीपट, लघुपट, ॲनिमेशनपट निर्मात्यांनी भारतात येऊन चित्रीकरण करावं, असं आवाहन मुरुगन यांनी यावेळी केलं. अनेक सिने अभिनेते, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला आणि प्रतिष्ठेच्या कान चित्रपट महोत्सवात यंदा ला सिनेफ पुरस्कार पटकवणारा 'Sunflowers Were The First Ones To Know' हा लघुपटही आज दाखवण्यात आला. त्यापूर्वी बिली अँड मॉली- ॲन ऑटर लव्ह स्टोरी हा उद्घाटनाचा चित्रपट दाखवण्यात आला. २१ जूनपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात एकंदर ३१४ चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

<><><><><>

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार तसंच युवा पुरस्कार आज जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूत बंगला' या कादंबरीला बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. तर युवा पुरस्कारात तुळजापूर इथले साहित्यिक देविदास सौदागर लिखित 'उसवण' या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. पन्नास हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं दोन्ही पुरस्काराचं स्वरूप असून, पुरस्कार वितरणाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार असल्याचं, साहित्य अकादमीनं जाहीर केलं आहे.

<><><><><>

भुजमध्ये झालेल्या भुकंपाच्या स्मृतीप्रित्यर्थ तयार करण्यात आलेल्या स्मृतीवन संग्रहलयाचा समावेश युनेस्कोच्या प्रिक्स व्हर्सटाइल संग्रहालयांच्या जागतिक यादीत झाला आहे. पहिल्यांदाच देशातल्या एखाद्या संग्रहालयाचा समावेश या यादीत झाला आहे. या यादीत पर्यावरणाला सुंदर करणाऱ्या, अद्वितीय आरेखन असणाऱ्या कृतींचा समावेश केला जातो.

या निर्णयाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. कुठल्याही परिस्थितीशी जुळवून घेण्याची मानवी लवचिकता आणि धैर्य यांची आठवण हे संग्रहालय करुन देतं, असं ते म्हणाले. जगातल्या ७ सर्वात सुंदर संग्रहालयांमध्ये याचा समावेश झाल्याबद्दल गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांनीही आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

इटलीतील मॉन्टोन इथं उभारण्यात आलेल्या व्ही. सी. यशवंत घाडगे सनडायल मेमोरियलचा विस्तार करण्याचे आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबतच्या बैठकीत दिले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली. दुसर्या महायुद्धात भारताच्या लष्कराच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख इटली सरकारनं केला आहे. व्हिक्टोरिया क्रॉस पदक विजेते नायक यशवंत घाडगे हे सातारा जिल्ह्यातल्या माणगाव तालुक्यातले रहिवासी होते. १९४४ मध्ये त्यांना वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी वीरमरण आलं होतं.

**<><><><><>**

राज्यात कोणत्याही बी- बियाणांची चढ्या भावानं विक्री किंवा बोगस बियाण्यांची विक्री आणि लिंकिंग सारखे अपराध करणाऱ्या कृषी निविष्ठा दुकानदारांवर यापुढे कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातले सर्व विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कृषी अधिकारी यांची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात आता एक ऐवजी अतिरिक्त तीन भरारी पथकं नेमावीत तसंच या भरारी पथकांनी दररोज कमीत कमी २५ दुकानांवर धडक भेटी देऊन तपासण्या कराव्यात, कोणताही गैरप्रकार आढळल्यास जागच्या जागीच गुन्हा दाखल करून परवाना निलंबनाची कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी जून अखेर पर्यंत पीक कर्जाचं उद्दिष्ट ७५ टक्के मर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना मुंडे यांनी दिल्या.

**<><><><><>**

चालू वर्षात म्हणजेच २०२४ च्या पहिल्या तिमाहीत श्रीलंकेचा सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्यावर पोचला आहे. श्रीलंकेच्या जनगणना आणि सांख्यिकी विभागानं चालू तसंच २०१५ सालच्या स्थीर किंमतींवर आधारीत देशांतर्गत अंदाजित सकल उत्पादनाची आकडेवारी जारी केली. यानुसार श्रीलंकेचे सकल राष्ट्रीय उत्पादन मूल्य ३ हजार ३२९ अब्ज श्रीलंकन रुपयापर्यंत पोचलं आहे. २०२२ मध्ये परकीय चलनाचा साठा कमी झाल्यानं, आणि त्यामुळं परिकीय कर्जाची परतफेड करता न आल्यानं, जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा होऊन श्रीलंका आर्थिक संकटात सापडला होता.

**<><><><><>**

आयसीसी टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि कॅनडा संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना फ्लोरिडा इथल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होणार होता. मात्र मैदान ओलं असल्यानं अजून नाणेफेक झालेली नाही.

**<><><><>**

राजधानी नवी दिल्लीत निर्माण झालेल्या पाणी टंचाई प्रश्नावरून भाजप आणि काँग्रेस आक्रमक झाले आहेत. आज दोन्ही पक्षांनी नवी दिल्लीत वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलनं केली.

**<><><><>**

केंद्रीय विधी आणि न्याय मंत्रालयातर्फे उद्या कोलकत्यात **‘गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनातील भारताचा प्रगतीशील मार्ग’** या विषयावर परिषदेचं आयोजन केलं आहे. भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम २०२३ या तीन नवीन कायद्यांची वैशिष्ट्य, त्यांची विस्तृत माहिती प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून करून देणं, हा या परिषदेचा मुख्य हेतू असल्याचं मंत्रालयानं सांगितलं. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये या तिन्ही कायद्यांना राष्ट्रपतींनी मंजूरी दिली असून येत्या एक जुलैपासून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**<><><><>**